अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 23 एप्रिल 2026 | वर्ष 11 वे | अंक 36 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# एलएमबी स्कुलचा 'सीबीएसई' परीक्षेत ऐतिहासिक निकाल

## ११ विद्यार्थ्यांना 'आयटी' विषयात पैकीच्या पैकी मार्कस्

## उज्ज्वल यशाची परंपरा कायम!

ब्रह्मपुरी/का.प्र.

शिक्षणाचा दर्जा उंचावत यशाची नवनवीन शिखरे सर करणाऱ्या एन. एच. एज्युकेशन सोसायटी संचलित एल. एम. बी. पब्लिक स्कूल, ब्रह्मपुरी या शाळेने दरवर्षीप्रमाणे यंदाही सीबीएसई १० वी बोर्ड परीक्षेत आपला दबदबा कायम राखला आहे. शाळेचा निकाल केवळ १०० टक्केच लागला नाही, तर तब्बल ३६ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शंतनु निलेश राऊत याने ९७.४% गुण मिळवून शाळेतून प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. तर द्वितीय क्रमांक: सोहम सागर आखाडे



शंतनु एन. राऊत
९७.४ टक्के



सोहम एस. आखाडे
९७.२ टक्के



सम्यक एम. धोंगडे
९७ टक्के



शौर्य एम. कुरसुंगे
९६.८ टक्के



सक्षम सी. वसाके
९६.६ टक्के

(९७.२%), तृतीय क्रमांक: सम्यक मनोरंजन धोंगडे (९७%), चतुर्थ क्रमांक: शौर्य मिलिंद कुरसुंगे (९६.८%), पाचवा क्रमांक: सक्षम चंद्रशेखर वसाके (९६.६%) यांनी प्राप्त केला आहे. यावर्षी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांत पैकीच्या पैकी गुण मिळवून इतिहास रचला आहे.

मराठी विषयात सम्यक धोंगडे, समृद्धी ठाकरे, वल्लभ हर्षे आणि सात्विकी राऊत या चार विद्यार्थ्यांनी मराठी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले. तसेच आयटी (IT): माहिती तंत्रज्ञान विषयात तब्बल ११ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. यामध्ये शंतनु राऊत, सोहम आखाडे, सक्षम वसाके, सार्थ लेनगुरे, उत्कर्ष नाकाडे, मैथिली चौधरी, पुर्वा हेमके, अयान वडसरिया, पियुश चहांदे, स्नेहित

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# ब्रम्हपुरी शहरात अतिक्रमण आणि दहशतीचा उद्रेक!

## मध्यरात्री अनाधिकृत बांधकाम; नागरिक आक्रमक; तणावपूर्ण धमक्यांमुळे परिसरात तणावपूर्ण शांतता

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील गांधीनगर परिसरात नगरपरिषदेच्या मालकीच्या सार्वजनिक जागेवर आणि समाजभवनावर काही समाजकंटकांनी संगनमताने बेकायदेशीर कब्जा केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, २१ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री २ वाजताच्या सुमारास हे अनधिकृत बांधकाम गुपचूप सुरू करण्यात आले होते. या कृत्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, याप्रकरणी जिल्हाधिकारी, पालकमंत्री आणि मुख्यमंत्र्यांकडे धाव घेऊन कठोर फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

गांधीनगर येथील नगरपरिषदेच्या मालकीची जागा सार्वजनिक उपयोगासाठी राखीव आहे. मात्र, काही व्यक्तींनी या जागेवर कोणतेही कायदेशीर परवाने न घेता अनधिकृत बांधकाम सुरू केले. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत हे बांधकाम सुरू असताना जागरूक नागरिकांना याची माहिती मिळाली. नागरिकांनी तातडीने पोलिसांना पाचारण केल्यामुळे मोठा अनर्थ टळला आणि बांधकाम थांबवण्यात आले.

निवेदनातील माहितीनुसार, या जागेवर असलेल्या सार्वजनिक समाजभवनावरही संबंधित व्यक्तींनी बेकायदेशीर ताबा मिळवला आहे. त्या ठिकाणी विशिष्ट धार्मिक चिन्हे आणि झेंडे लावून सार्वजनिक मालमत्तेचा खासगी आणि एकतर्फी वापर सुरू करण्यात आला आहे. यामुळे परिसरातील इतर समाज बांधवांना या भवनाचा वापर करण्यास मज्जाव केला जात असून, सार्वजनिक हक्कांचे सरळ उल्लंघन होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या बेकायदेशीर कृत्याला स्थानिक नागरिकांनी विरोध केला असता, त्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागत आहे. संबंधित व्यक्तींकडून नागरिकांना 'अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम' (Atrocity Act) अंतर्गत खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जात आहे. अशा धमक्यांमुळे परिसरात भीतीचे आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नागरिकांनी प्रशासनाला दिलेल्या पत्रात भारतीय दंड संहितेच्या (IPC) विविध कलमांचा उल्लेख केला आहे. कलम ४४१ व ४४७: गुन्हेगारी अतिक्रमण, कलम ४२५ व ४२७: सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, कलम ५०३ व ५०६: नागरिकांना धमकावणे, कलम १२०(B) व ३४: सामूहिक कट रचून केलेले कृत्य तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम (MRTP), १९६६ आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# कॉर्पोरेट जगतातील विकृत चेहरा

नाशिकमधील टाटा कन्सलटन्सी सर्विसेस (टीसीएस) या बहुराष्ट्रीय आयटी कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांवरील कथित लैंगिक छळ, मानसिक अत्याचार आणि धर्मांतरणाच्या दबावाचे प्रकरण हे केवळ एक गुन्हेगारी प्रकरण म्हणून पाहता येणार नाही. हे प्रकरण भारतातील कॉर्पोरेट क्षेत्राच्या आतल्या संस्कृतीवर, व्यवस्थापनाच्या उत्तरदायित्वावर आणि महिलांच्या सुरक्षेच्या वास्तव स्थितीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. चौथ्या पीडितेच्या जबाबातून समोर आलेली माहिती अंगावर काटा आणणारी आहे; परंतु त्याहून अधिक भयावह गोष्ट म्हणजे या सर्व प्रकारांकडे वरिष्ठांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप या प्रकरणात होत आहे. या प्रकरणाने केवळ नाशिक किंवा महाराष्ट्रच नव्हे, तर देशभरातील कॉर्पोरेट जगतातील सुरक्षिततेच्या संकल्पनेलाच हादरा दिला आहे. कॉर्पोरेट म्हणजे सुरक्षित, व्यावसायिक आणि शिस्तबद्ध ही जी सर्वसाधारण समजूत आहे, ती या घटनेने पूर्णपणे खोटी ठरवली आहे.

पीडितेच्या जबाबानुसार, आरोपी रझा मेमनने केलेला छळ हा केवळ शारीरिक किंवा शब्दिक नव्हता, तर तो मानसिक, डिजिटल आणि अत्यंत नियोजित पद्धतीने करण्यात आला होता. कोडी घालण्याच्या नावाखाली सुरू झालेला संवाद हळूहळू अश्लील आणि वैयक्तिक पातळीवर पोहोचला. हे आपल्या दोघांमध्येच गुपित ठेव या वाक्याने सुरू झालेली ही प्रक्रिया म्हणजे छळाच्या नव्या पद्धतीचे उदाहरण आहे. विशेष म्हणजे, लग्नानंतर पीडितेवर होणाऱ्या अश्लील टिप्पणींनी या प्रकरणाला अधिक गंभीर बनवले. तू रात्री कशात व्यस्त असतेस? हा प्रश्न केवळ अश्लील नाही, तर तो महिलांच्या सन्मानावर थेट आघात करणारा आहे. अशा प्रकारचे वक्तव्य एखाद्या सहकाऱ्याकडून येणे हेच चिंताजनक आहे; पण त्यावर व्यवस्थापनाने कोणतीही ठोस कारवाई न करणे हे अधिक धोकादायक आहे. यापेक्षा भयानक बाब म्हणजे, आरोपींनी पीडितेच्या कामाच्या सिस्टिममध्ये छेडछाड करून तिच्यावर कामाचा ताण वाढवला. म्हणजेच छळ हा केवळ वैयक्तिक नव्हता, तर तो व्यावसायिक पातळीवरही पसरला होता. हे कॉर्पोरेट बुलिंगचे अत्यंत विकृत रूप आहे. या प्रकरणात सर्वात गंभीर आरोप म्हणजे वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका होय. पीडितेने तक्रार केल्यानंतर तिला हा विषय इथेच संपवून टाक, असे सांगितले गेले. म्हणजेच तक्रार निवारण यंत्रणा केवळ कागदावरच अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होते.

या प्रकरणात धर्मांतरणाच्या दबावाचा आरोपही करण्यात आला आहे. काही सूत्रांनी याला कॉर्पोरेट जिहाद असे संबोधले आहे. मात्र, अशा संवेदनशील विषयांकडे अत्यंत जबाबदारीने पाहणे आवश्यक आहे. कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्याआधी निष्पक्ष तपास होणे गरजेचे आहे. धर्म, लिंग आणि सत्ता यांचा संगम जेव्हा शोषणासाठी वापरला जातो, तेव्हा तो समाजासाठी अधिक धोकादायक ठरतो. त्यामुळे या प्रकरणाचा तपास केवळ गुन्हेगारी चौकटीत न ठेवता सामाजिक आणि संस्थात्मक पातळीवरही केला पाहिजे. या प्रकरणाची दखल राष्ट्रीय महिला आयोगाने घेतली असून, उच्चस्तरीय समितीने घटनास्थळी भेट दिली आहे. ज्यामुळे तपासाला विश्वासार्हता प्राप्त झाली आहे. याशिवाय, पोलिसांच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) ही या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे. आरोपींनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली असून, पुढील काही दिवसांत या प्रकरणात महत्त्वाच्या घडामोडी होण्याची शक्यता आहे.

नाशिक टीसीएस प्रकरण हे फक्त एखाद्या कंपनीचे अपयश नाही, तर ते संपूर्ण कॉर्पोरेट व्यवस्थेतील त्रुटींचे प्रतिबिंब आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी असलेल्या धोरणांची अंमलबजावणी कितपत प्रभावी आहे, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. नाशिक टीसीएस प्रकरण हे केवळ काही व्यक्तींच्या विकृत मानसिकतेचे उदाहरण नाही, तर ते एका मोठ्या संस्थात्मक अपयशाचे प्रतीक आहे. महिलांच्या सुरक्षेबाबत केवळ कायदे बनवून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची आहे. आज गरज आहे ती झिरो टॉलरन्स धोरणाची, जेथे कोणत्याही प्रकारच्या छळाला मुळीच जागा दिली जाणार नाही. अन्यथा, कॉर्पोरेट जगतातील हा काळा चेहरा पुन्हा पुन्हा समोर येत राहील आणि महिलांचा विश्वास कायमचा डळमळीत होईल.

# 'बालकांचा पूर्वशालेय विकास' यावर व्याख्यान

## ने.हि. महाविद्यालयाच्या गृहअर्थशास्त्र विभागातर्फे आयोजन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ने. हि. महाविघालय ब्रम्हपुरी येथे गृहअर्थशास्त्र विभागात शुक्रवार दि. १०/०४/२०२६ ला व्याख्यान व फॅशन डिझायनिंग कोर्सचे प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविघालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर सर व प्रमुख अतिथी शांताबाई भैय्या महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. वरभे सर तसेच डॉ. हर्षा कानफाडे तसेच कलाशाखा विभाग प्रमुख डॉ. डांगे सर,




कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता डॉ. अर्चना तत्ते, प्राचार्य अनुभूती प्रशाला, ब्रम्हपुरी हे लाभले होते. तसेच महाविद्यालयाचे अधिक्षिक संगिता ठाकरे ह्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहअर्थशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. सोनाली पारधी यांनी केले. शारदास्तवन व दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. अर्चना तत्ते यांनी "बालकांचा पूर्वशालेय विकास" या विषयावर बोलतांना बालकाच्या विकासावर मोबाईलचा कसा दुष्परिणाम होत आहे यावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. सोबतच मान्यवरांच्या उपस्थितीत फॅशन डिझायनिंग कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थीनींना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. प्रमुख अतिथींच्या मार्गदर्शनानंतर विद्यार्थीनींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन कु. रजनी लेंजे तर आभार प्रदर्शन कु. माहेश्वरी घोडमारे हीने केले तसेच अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली. समारोपिय कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रा. डॉ. सोनाली पारधी, प्रा. डॉ. अनिता बगमारे, प्रा. अस्मा खान, प्रा. शितल पांचाळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. बी. ए. प्रथम व द्वितीय वर्ष तसेच एम. ए. प्रथम वर्षाच्या विदयाथीनींनी परिश्रम घेतले.

# 'क्लिनिकल रिसर्च आणि मेडिकल कोडिंग' या विषयावर कार्यशाळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि.२०.४.२०२६ रोजी महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी महाविद्यालयात स्प्रूस लाईफ स्किल्स नागपूर तर्फे 'क्लिनिकल रिसर्च आणि मेडिकल कोडिंग' या नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दुधे, शरदकुमार हलमारे संचालक स्प्रूस लाईफ स्किल्स नागपूर, कार्यक्रम समन्वयक कू.शिवानी पांडे, वैभव कुलकर्णी समन्वयक, वैभव गुरव मंचावर उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक रिलेशनशिप मॅनेजर वैभव गुरव यांनी स्प्रूस स्किल्स ही विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी कोणत्या विषयावर कार्यशाळा आयोजित करते तसेच त्यांना नोकरीच्या कोणत्या क्षेत्रात संधी उपलब्ध आहेत या बद्दल प्लेसमेंट कोर्डिनेटर कू.शिवानी पांडे यांनी




उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले.

कार्यशाळेनंतर क्षमता चाचणी घेण्यात त्यात बी.फॉर्म अंतिम वर्षाचा विद्यार्थी पियूष शेंडे याने प्रथम स्थान तसेच कू.सलोनी जुवारे बी.फॉर्म अंत्य द्वितीय स्थान तर कू.सोनल लांजेवार डी.फॉर्म प्रथम वर्ष हिने तृतीय स्थान प्राप्त केले. तसेच कू.श्रुती पिसे डी.फॉर्म द्वितीय वर्ष हिने प्रथम स्थान तर अय्यान सय्यद डी.फॉर्म द्वितीय वर्ष याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कार्यशाळेचे संचालन प्रा. पूजा घुटके यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.देवाशीष भरणे यांनी केले.

## 😂 विनोदिनी 😂

*वकील: (औरत से) हाँ तो बताइए आपके तलाक की ज़मीन क्या है ?*
*औरत: ज़मीन, शहर के बीचो बीच एक बहुत बड़ा बंगला है।*
*वकील: नहीं - नहीं, मेरे कहने का मतलब है कि तलाक़ के लिए ग्राउंड्स क्या है?*
*औरत: ग्राउंड तो बंगले के पास ही है पर ज्यादा बड़ा नहीं है।*
*वकील: आप समझ नहीं रही है मैं आधार की बात कर रहा हूँ?*
*औरत: आधार कार्ड तो बना हुआ है पर उसका कैमरा अच्छा नहीं था तो फोटो अच्छी नहीं आई।*
*वकील: मेरा मतलब तलाक की नींव क्या है ??*
*औरत: नींव बहुत गहरी है आप फ़िक्र न करे।*
*वकील: देवी जी आप तलाक़ क्यों लेना चाहती है?*
*औरत: तलाक में नहीं मेरे पति लेना चाहते है।*
*वकील: (पति से) आपके अपनी पत्नी से तलाक लेने की वजह क्या है?*
*पति: यही मगज़मारी जो अभी आपके साथ हुई मेरे साथ रोज़ होती है।*

# मेंडकी सेवा सहकारी संस्थेवर भाजपचा झेंडा, अध्यक्षपदी पहिल्यांदाच महिला

## माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या नेतृत्वात विजय, १३ पैकी ८ उमेदवारांचे यश

ब्रम्हपुरी/का.प्र

तालुक्यातील सर्वात मोठी सेवा सहकारी संस्था मेंडकी रजि.नं.७७४ ची सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत काँग्रेस प्रणीत शेतकरी विकास पॅनल आणि भाजपा प्रणित किसान सहकार विकास पॅनल आमने-सामने होते. भाजप प्रणित आघाडीचे नेतृत्व माजी तालुकाध्यक्ष प्राचार्य अरुणजी शेंडे, भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा वंदनाताई शेंडे तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रा. यशवंत आंबोरकर यांनी ही निवडणूक



प्रतिष्ठेची केली. भाजपा ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार प्रा.अतुल भाऊ देशकर यांच्या यशस्वी मार्गदर्शनाखाली ही निवडणूक लढवली गेली आणि ऐतिहासिक असा विजय संपादन करण्यात आला. यात अध्यक्ष पदी मेंडकी सेवा सहकारी संस्थेवर महिलेची निवड करण्यात आली. वंदना अरूण शेन्डे यांची अध्यक्ष पदावर वर्णी लागली आहे.

भाजपा प्रणित आघाडीने एकूण १३ उमेदवारांपैकी ८ उमेदवार निवडून आणून विरोधी पॅनल काँग्रेसला जोरदार धक्का दिला आणि काँग्रेसची विजयी परंपरा खंडित केली. विजयी उमेदवारांमध्ये महिला राखीव गटातून वंदना अरुण शेंडे आणि अरुणा रामकृष्ण दिघरे विजयी झाल्या तर सर्वसाधारण गटातून रवींद्र खटू गुरूनुले, पुरुषोत्तम गोपाळा ठाकरे, कवडू शालीकराम आंबोरकर, युवराज मारोती ढोरे, सुधाकर गणपत महाडोरे, प्रकाश रामचंद्र ठाकरे यांनी विजयी पताका फडकवली. या निवडणुकीमध्ये राजेंद्र दिवाकर आंबोरकर, राजेंद्र दादाजी आंबोरकर, सचिन गुरनुले, चिंतामणजी जेलेवार, विष्णूजी गुरनुले, कृष्णाजी बोरुले इत्यादीने अथक परिश्रम घेतले आणि विजय खेचून आणला.

विजयी उमेदवारांचे आमदार सुधीर मुनगंटीवार, माजी आमदार प्रा.अतुलभाऊ देशकर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, माजी खासदार अशोक नेते, भाजयुमो जिल्हा महामंत्री तनय देशकर,जिल्हा सचिव साकेत भानारकर, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर दिवटे, तालुका महामंत्री प्रा.रामलाल दोनाडकर, प्रसिध्दी प्रमुख प्रा.संजय लांबे, शहराध्यक्ष प्राचार्य सुयोग बाळबुध्दे, नगरसेवक मनोज भूपाल, माजी नगरसेवक मनोज वठे यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# बाबासाहेबांची धम्मक्रांती पुढे न्या व देश वाचवा!

## भदन्त हर्षबोधी महास्थवीर : १३५ वा जयंती सोहळा संपन्न




ब्रह्मपुरी/का.प्र.

'स्वाभीमान, अस्मिता, मुलभूत अधिकार बाबासाहेबांनी आपल्याला मिळवून दिलं. आई-वडीलांनी तुम्हाला शिक्षण दिले पण धम्म बाबासाहेबांनी दिला. ते राजनैतिक सत्ता आणण्यासाठी झटले. प्रत्येक माणूस रिपब्लिकन झाला पाहिजे, असे त्यांना वाटे. आज जगाला बुद्धाची गरज आहे. बुध्द धम्म मूर्तीत नाही, विहारात नाही तो आचरणात आहे. आज बाबासाहेबाचे धर्मांतर साकार करण्याची गरज आहे म्हणून बाबासाहेबांची धम्मक्रांती पुढे न्या व देश वाचवा!' असे आवाहन बुध्दगयाचे भदन्त हर्षबोधी महास्थवीर यांनी केले.

ते येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित डॉ बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंती उत्सव सोहळयातील जाहीर व्याख्यानात अध्यक्षपदावरुन बोलत होते. विचारमंचावर मुख्य अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालय, दिल्लीचे ॲड प्रदीप कुमार, प्रमुख वक्ते म्हणून नागपूर येथील दै. लोकमतचे संपादक श्रीमंत माने, ॲड संदिपकुमार सिंग यांच्यासह कवी प्रभूजी राजगडकर, समितीचे अध्यक्ष अशोक रामटेके, उपाध्यक्ष सुधीर अलोने, सचिव डॉ युवराज मेश्राम, सहसचिव सुधाकर पोपटे, कोषाध्यक्ष के.जी.खोब्रागडे, संघटक नेताजी मेश्राम, महिला संघटक छायाताई जांभुळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्रीमंत माने म्हणाले की, राज्यघटनेवर प्रेम करणाऱ्या मतदारांची या देशातील सत्तेला भिती वाटते. आपल्याला फुले- शाहू -आंबेडकर प्रबोधनाची परंपरा लाभली आहे, ती पुढे न्यावी लागेल. त्यांच्याप्रती कायम कृतज्ञ रहावे लागेल. ॲड प्रदीपकुमारांनी, बाबासाहेब समानतेसाठी लढले असून संबंध स्त्रियांना त्यांनी कशी समानता मिळवून दिली? यावर विवेचन केले तर ॲड संदिपकुमार सिंग यांनी बाबासाहेबांच्या तेजस्वी व्यक्तिमत्वावर व कार्यावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे अध्यक्ष अशोक रामटेकेंनी केले. संचालन समिती सचिव डॉ युवराज मेश्राम तर आभार प्रदर्शन समिती संघटक नेताजी मेश्राम यांनी केले. यशस्वीतेसाठी आसाराम बोदेले, इंजि.विजय मेश्राम, ॲड सुभाष मेश्राम, बौध्दरक्षक जांभुळकर, राजू मेश्राम, सूरज नंदेश्वर, अमरदीप मेश्राम, नरेंद्र बांते, डॉ इ.एल.रामटेके, जगदिश मेश्राम, भीमानंद मेश्राम इत्यादींनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला श्रोत्यांनी गर्दी केली होती.


**ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता**

www.bramhapuri samachar.com/bs

**या ऑनलाईन साईटला भेट द्या**

**बातम्यांकरीता संपर्क :**

मो. 9503100964

मो. 8275715315


# 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा'

## पाणपोईचे उद्घाटन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरात एक अतिशय प्रेरणादायी व मानवतेचा जागर करणारे समाजाभिमुख उपक्रम राबविण्यात आला. मागिल वर्षी प्रा. डॉ. संजय हर्षे (माजी




प्राचार्य) यांनी स्थापन केलेल्या मानवकुटी जीवन संशोधन केंद्रामार्फत ते अनेक लोकोपयोगी उपक्रम करीत असतात. यावर्षी १४ एप्रीला त्यांचे वडील स्व. प्रभाकरराव हर्षे यांच्या ३८ व्या पुण्यतिथी दिनाप्रित्यर्थ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी त्यांनी पाणपोईची स्थापना केली. हे कार्य जनकल्याणाच्या दिशेने टाकलेले मोलाचे पाऊल ठरले आहे.

ज्ञानेश नगर, वडसा रोड येथे प्रा. डॉ. हर्षे यांच्या निवासस्थानी उभारण्यात आलेल्या पाणपाईचे उद्घाटन माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या शुभ हस्ते झाले. या प्रसंगी बोलतांना प्रा. डॉ. हर्षे यांनी अत्यंत हृदयस्पर्शी भावना व्यक्त केल्या. 'सर्व धर्म श्रेष्ठ असले तरी मानव धर्माचे पालन करणे हे सर्वात महत्वाचे आहे. आपल्या आई-वडीलांचे ऋण कधीच फेडता येत नाही, मात्र फुल नाही फुलांची पाकळी अर्पण करू शकतो,' अशा शब्दात त्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. मानव हाच ईश्वर आहे आणि मानव सेवा हिच ईश्वर सेवा आहे. असे त्यांनी नम्रपणे सांगितले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अतुल गौरशेट्टीवार, गजपूरे, प्रा. दिलीप जगनाडे, प्रा. विटाळकर सर, विलास खरवडे, नानाजी गराडे, दिलीप शिनखेडे पत्रकार, कु. वैभवी येरमा, कु. चांदणी येरमा यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरीक उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रम अधिकच गौरवशाली ठरला. या उपक्रमामुळे समाजात एक सकारात्मक संदेश गेला आहे की, आई-वडीलांच्या स्मृतींचे जतन सेवा आणि परोपकाराच्या माध्यमातुन करता येते. अशा लोकोपयोगी कार्याची प्रेरणा घेण्याची गरज आहे.

# १२ दिवसांच्या साखळी उपोषणानंतर आता 'आमरण उपोषण' सुरू

## ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या मुजोर कारभार, अनाधिकृत यंत्रणे आणि मोबाईल टॉवरवरून जनक्षोभ

ब्रम्हपुरी /का.प्र.

सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणाऱ्या आणि प्रभावशाली घटकांना संरक्षण देणाऱ्या ब्रह्मपुरी नगरपरिषदेच्या 'मुजोर' प्रशासनाविरुद्ध आता संतापाची लाट उसळली आहे. विविध मूलभूत मागण्यांसाठी गेल्या १२ दिवसांपासून सुरू असलेल्या साखळी उपोषणाची प्रशासनाने दखल न घेतल्याने, अखेर २१ एप्रिल २०२६ पासून शिवसेनेच्या ( शिंदे गट ) वतीने नगरपरिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.




नगरपरिषद हद्दीत कायद्याचे उल्लंघन होत असतानाही प्रशासन 'धृतराष्ट्रा'ची भूमिका घेत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. शहरात विनापरवानगी उभारण्यात आलेले मोबाईल टॉवर नागरिकांच्या आरोग्यासाठी घातक ठरत आहेत, तरीही ते हटविण्याऐवजी प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे. तसेच, शहरातील स्वच्छतेचा पुरता बोजवारा उडाला असून स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. नगरपरिषदेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेतील दुजाभावही आता चव्हाट्यावर आला आहे. रस्त्यावरील छोट्या पथविक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारणारे प्रशासन, प्रभावशाली आणि श्रीमंत व्यावसायिकांच्या बेकायदेशीर बांधकामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. 'कायद्यापुढे सर्व समान' या तत्त्वाची ब्रह्मपुरीत पायमल्ली होत असून, प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

लोकशाही मार्गाने १२ दिवस शांततेत साखळी उपोषण करूनही प्रशासनाला जाग आली नाही, हीच प्रशासनाच्या अपयशाची मोठी पावती आहे. आता हे आंदोलन आमरण उपोषणाच्या टप्प्यावर पोहोचले असून, उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीला काही इजा पोहचल्यास त्याला सर्वस्वी नगरपरिषद प्रशासन जबाबदार असेल, असा इशारा देण्यात आला आहे. आता नगरपरिषद प्रशासन या आमरण उपोषणाची दखल घेऊन ठोस कारवाई करते की आंदोलनाला अजून चिघळू देते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

> **'प्रशासनाने वेळेत संवाद साधून प्रश्न सोडवले असते, तर आज नागरिकांवर ही टोकाची वेळ आली नसती. मुजोर अधिकाऱ्यांनी आणि सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली काम करणाऱ्या यंत्रणेने आता तरी शुद्धीवर यावे.'**
> **–नरु नरड, आंदोलनकर्ता शिवसेना ( शिंदे गट )**

# सायकल रेस स्पर्धेत मानसी फटिंग अव्वल

## शेजल देशमुख द्वितीय तर कोमल उरकुडे तृतीय स्थानी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त भारतीय जनता



पक्ष महिला शहर आघाडीच्या वतीने महिला व मुलींसाठी खुल्या गटातील सायकल रेसचे आयोजन करण्यात आले होते. ही रेस छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तुंबळी मेंढा या दरम्यान घेण्यात आली. यात प्रथम येण्याचा मान कु. मानसी शेखर फिटिंग हिने प्राप्त केले. तिला पाच हजार रूपये रोख व प्रमाणपत्र प्रायोजक रश्मीताई पेशने यांच्याकडून देण्यात आले.

द्वितीय बक्षीस कु. सेजल गोर्वधन देशमुख रु. तीन हजार व प्रमाणपत्र प्रायोजक मंजरी मोहन राजनकर यांच्या कडून देण्यात आले. तिसऱ्या बक्षीसाची मानकरी कोमल हरिदास उरकुडे रु. दोन हजार व प्रमाणपत्र प्रायोजक वर्षा जगदीश चौधरी यांच्या कडून देण्यात आले. तसेच प्रोत्साहन पर तीन बक्षीसे एक हजार रुपये प्रमाणे देण्यात आली. यात अमृता किशोर ठाकरे, खुशी स्वप्नील मेश्राम, सुषमा अजय बेदरे ह्यांनी प्राप्त केली.

या बक्षीसांचे वितरण ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा. अतुल देशकर व ब्रम्हपुरी पोलीस ठाणेदार प्रमोद बानबले यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्याकरीता आरोग्य विभाग व पोलीस विभागाचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच स्पर्धा घेण्यासाठी सी. पी. जेम्स व मिलिंद पाठक यांचे विशेष सहकार्य लाभले. ही संपूर्ण स्पर्धा आयोजित करण्यासाठी भाजपा महिला आघाडीच्या वंदना शेंडे, रश्मीताई पेशने, वर्षाताई चौधरी, मंजरीताई राजनकर, साधनाताई सातपुते, विभा सुभेदार, चेतना येवले, गीताताई जांभुळे, बगमारे ताई, पुष्पा गराडे, रेशमी झोडे, सुर्यकांता गेडाम, वर्षा जोशी, हेमलता नंदुरकर, व भाजपाचे शहर अध्यक्ष डॉ. प्रा. सुयोग बाळबुधे, नगरसेवक मनोज भूपाल, प्रा. प्रकाश बगमारे, अरुण शेंडे, प्रशांत वसाके, पवन जयस्वाल, अरविंद नंदुरकर, राजु भागवत, प्रकाश लोखंडे, प्रा. दिलीप जुमडे , प्रा. अशोक सालोटकर, प्रा.संजय लांबे, प्रा. चंद्रकांत विटाळकर या सर्वांचे सहकार्य लाभले.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# माहीन शेख निबंध स्पर्धेत अव्वल

## ने.हि. महाविद्यालयात निबंध स्पर्धा



ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे दि. ८ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्यात आला. 'ज्ञानयोगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर घेतल्या गेलेल्या निबंध स्पर्धेत प्रथम पारितोषिक माहीम सलाम शेख या विद्यार्थिनीने पटकावले. द्वितीय खुशी घोरमोडे तर तृतीय पारितोषिक रोहिणी हजारे यांनी मिळवले. उत्तेजनार्थ पारितोषिक किशोर मडावी व हर्ष हेडाऊ यांना मिळाले.

पारितोषिकाचे स्वरूप स्मृतिचिन्हे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित पुस्तकाचे वाटप करण्यात आले. या निबंध स्पर्धेसाठी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. पद्माकर वानखडे यांनी प्रभारी म्हणून काम पाहिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर तसेच वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. रेखा मेश्राम यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. मिलिंद पठाडे तर प्रभारी ग्रंथपाल सुषमा राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला समिती सदस्य डॉ.वर्षा चंदनशिवे, कला शाखाप्रमुख डॉ. राजेंद्रकुमार डांगे, मराठी विभागप्रमुख डॉ.धनराज खानोरकर, डॉ. मोहन कापगते, डॉ. युवराज मेश्राम, प्रा. बालाजी दमकोंडवार, डॉ. अभिमन्यू पवार उपस्थित होते.

# आवळगांव व पिपळगांव येथे 'महाराजस्व समाधान शिबीर' संपन्न

## ५२६ लाभार्थ्यांना विविध शासकीय दाखल्यांचे वाटप



ब्रम्हपुरी/का.प्र.

ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि विद्यार्थ्यांचे महसूल विभागाशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाच्या निर्णयानुसार 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' राबवले जात आहे. याच अभियानांतर्गत १७ एप्रिल २०२६ रोजी पिंपळगाव (आवळगाव परिसर) येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या एकाच शिबिरातून ५२६ लाभार्थ्यांना विविध दाखले आणि प्रमाणपत्रांचे वाटप करून महसूल प्रशासनाने आपली गतिमानता सिद्ध केली आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन ब्रम्हपुरीचे तहसीलदार सतिश मासाळ यांच्या हस्ते पार पडले. यावेळी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, 'महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि कार्यक्षम करण्यासाठी हे अभियान मोलाचा ठरेल. नागरिकांना चकरा न मारता एकाच ठिकाणी सर्व शासकीय सेवा मिळाव्यात आणि कोणत्याही पात्र व्यक्ती लाभापासून वंचित राहू नये, हाच शासनाचा आणि प्रशासनाचा मुख्य हेतू आहे.' या शिबिराला नायब तहसीलदार लीना बोबाटे, नायब तहसीलदार महानंदा मडावी, दुय्यम निबंधक जयंत मडावी आणि ग्रामसेवक प्रदीप तलमले यांची प्रशासकीय उपस्थिती होती. तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर जसे की, भाजपा युवा जिल्हा सरचिटणीस तनय देशकर, तालुका सरचिटणीस अविनाश म्हस्के, संदीप आष्टेकर, सरपंच प्रितम बावनवाडे आणि उपसरपंच गुरुदेव वाघरे उपस्थित होते.

शिबिरात जवळपास ६०० ते ७०० नागरिकांनी सहभाग नोंदवला. केवळ दाखल्यांचे वाटपच नव्हे, तर नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींवर चर्चा करून त्यांचे जागेवरच समाधान करण्यात आले. शासनाच्या भूमिकेमुळे ग्रामीण भागातील जनतेने समाधान व्यक्त केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांचे कैवारी

## - प्रा.डॉ. रविंद्र विखार

ब्रह्मपुरी/का.प्र.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दूरदृष्टी असणारे समाज सुधारक होते. त्यांनी केवळ संविधानाची निर्मिती केली असे



नव्हे तर या सोबतच दलित, ओबीसी, महिला, शेतकरी, कामगार, इत्यादींच्या उत्थानासाठी कार्य केले. म्हणून ते सर्वांचे कैवारी ठरतात,' असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन प्रा. डॉ.रवींद्र विखार यांनी केले.

शांतीनगर, गुरुदेव नगर व शाहूनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सम्यक बौद्ध विहार ब्रह्मपुरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३५ जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी आसारामजी बोदेले हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून कुरखेडा येथील मुनघाटे महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. रवींद्र विखार उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर सम्यक महिला मंडळाच्या अध्यक्ष अस्मिता मनोरंजन धोंगडे, प्रियंका हुमणे इत्यादी उपस्थित होत्या.

यावेळी त्यांनी बाबासाहेबांच्या विविध पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष आसारामजी बोदेले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक, राजकीय, सामाजिक विचार याप्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अस्मिता धोंगडे, संचालन देवानंद तुलकाने तर आभार प्रदर्शन प्रिया देशपांडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रियंका हुमणे, राजूबाई मेश्राम, कविता चौधरी, संजीवनी हुमणे व सर्व महिलांनी मोलाचे सहकार्य केले.

❀❀❀❀❀❀

# शालेय शिक्षण विभागातील समस्यांचा निपटारा करावा

## - प्रा. प्रकाश बगमारे

ब्रह्मपुरी/का.प्र.

अलीकडेच्या काळात पटसंख्या अभावी शाळांची संख्या कमी होत असून अनेक गावात शाळा नसल्यामुळे शाळा सोडणाऱ्या मुलांची संख्या जास्त होत आहे. समायोजनाचा प्रश्न या दृष्टीने विचार करण्यासाठी शासन स्तरावर एखादी समिती नेमून याचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे.

ग्रामीण भागातील शाळांची संख्या, त्यांचे प्रश्न, कर्मचाऱ्याचे समायोजन या सर्व बाबतीत योग्य असेल ते धोरण ठरवावे, अशी मागणी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांना वर्धा येथे भेटीदरम्यान भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव, प्रा प्रकाश बगमारे यांनी केली . विदर्भात उष्णतेचा तडाखा लक्षात घेऊन शाळांची निश्चित कालावधी कमी करणे आवश्यक होते. तसेच जेव्हा उपस्थिती व्यवस्थित असते अशा सप्टेंबर ते मार्च या कालावधीत तपासणी करणे योग्य असताना अयोग्य वेळी पट पडताळणी करणे हे सुद्धा चुकीचे आहे. शिक्षण क्षेत्रात भेडसावणाऱ्या या सर्व समस्यांवर उपाययोजना केल्या जाव्यात अशी विनंती प्रा. प्रकाश बगमारे यांनी डॉ पंकज भोयर, शालेय शिक्षण राज्यमंत्री यांच्याकडे केली.

राज्यातील अनेक गावे शाळा नसलेली असतील तर मुळातच उदासीन असलेली पिढी शिक्षणासाठी पुढे जाण्याची शक्यता नाही आणि म्हणून गाव तिथे शाळा हे धोरण सरकारने काहीही झाले तरी बदलविता कामा नये तरच खऱ्या अर्थाने समर्थ भारत निर्माण करण्याचे कार्य होऊ शकेल. या दृष्टीने सखोल अभ्यास करून शासनाने योग्य कारवाई करावी, अशी मागणी जनतेच्या वतीने प्रा प्रकाश बगमारे यांनी केली आहे. याप्रसंगी प्रा सुभाषचंद्र खोब्रागडे त्यांचे सोबत होते.

# एलएमबी स्कूलमध्ये महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कूल ब्रम्हपुरी येथे ११ व १४ एप्रिल रोजी अनुक्रमे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरूवात शाळेचे मुख्याध्यापक कादीर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम व पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांनी ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाल्यार्पण करून त्यांना वंदन केले. नंतर शाळेचे इयत्ता पाचवीचे विद्यार्थी विहान करंबे याने क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले व राजवर्धन मानकर याने महामानव भिमराव आंबेडकर यांची वेशभुषा परिधान करून या दोघांनी दोन्ही महामानवांच्या विचारावर प्रकाश टाकला.

सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन इयत्ता नववीची विद्यार्थीनी तन्वी वदनलवार हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांचे सहकार्य लाभले.

### ... QUOTES ...

**"Happiness is not something readymade. It comes from your own actions."**
**- Dalai Lama**

### चारोळी

आज परमेश्वर उद्या परमेश्वर
तिन्ही त्रिकाळ परमेश्वरच परमेश्वर...
बुडवायला थोडे उद्यार घ्यावे तर,
तिथेही आज नगद कल उधार...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# चौथीच्या विद्यार्थ्याचा अचानक मृत्यू, गणवेशातच कोसळला


## ब्रम्हपुरीतील हृदयद्रावक घटना

ब्रह्मपुरी/का.प्र.

शाळेत जाण्यासाठी तयार होत असलेल्या १० वर्षीय विद्यार्थ्यांचा अचानक मृत्यू झाल्याने ब्रह्मपुरीत हळहळ व्यक्त होत आहे. ही घटना सोमवारी सकाळी ७ च्या सुमारास देलनवाडी वॉर्डात घडली. ईशान सत्यपाल आत्राम असे मृत विद्यार्थ्यांचे नाव आहे.

लोकमान्य टिळक प्राथमिक शाळेत चौथीत शिकणारा ईशान नेहमीप्रमाणे सकाळी शाळेत जाण्यासाठी उठला होता. अंघोळ करून शाळेचा गणवेश परिधान करत असतानाच तो अचानक खाली कोसळला. पालकांनी तातडीने त्याला खिस्तानंद रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरु असतानाच अवघ्या काही वेळात त्याचा मृत्यू झाला. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित करताच कुटुंबावर शोककळा पसरली. प्राथमिक माहितीनुसार हृदयविकाराचा झटका कारण असू शकते, अशी चर्चा आहे. मात्र शवविच्छेदन न झाल्याने मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही.

१० वर्षीय मुलाला त्याच्या पालकांनी उपचारार्थ दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना अवघ्या अर्ध्या तासात त्या मुलाचा मृत्यू झाला. त्यामुळे त्याचा मृत्यू नेमका कशाने झाला हे सांगू शकत नाही, असे ख्रिस्तानंद रूग्णालयातील डॉ. डॉ. पठाणू राव यांनी सांगितले. त्याच्या पालकांना शवविच्छेदन करण्याचा सल्ला दिला. त्यास त्यच्या पालकांनी नकार दिला.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



## एलएमबी स्कुलचा 'सीबीएसई' परीक्षेत...

(पान क्र. १ वरून)

भानारकर आणि रूचा ढोक या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत या यशाबद्दल नेवजाबाई अशिता भैया, प्राचार्य कादिर कुरेशी यांनी सर्व गुणवंतांचे अभिनंदन केले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या संचालिका झोडे मॅम आणि संपूर्ण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे तोंडभरून कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेतील शिक्षक आणि पालकांच्या मार्गदर्शनाला दिले आहे. या



सार्थ बी. लेनगुरे
९६.२ टक्के



उत्कर्ष डी. नाकाडे
९५.४ टक्के



मैथिली आर. चौधरी
९५ टक्के



पूर्वा ए. हेमके
९५ टक्के



कुणाल पी. कोकोडे
९५ टक्के

भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष स्नेहलताताई भैया, सचिव अशोक भैया, सदस्य गौरव भैया, स्कूल चे संचालिका अशिता भैया मॅडम यांनीही 'पुढेही असेच यश संपादन करत राहा,' अशा शुभेच्छा व्यक्त केल्या. उपप्राचार्य राठी मॅम, पर्यवेक्षिका दणदणीत विजयामुळे संपूर्ण ब्रह्मपुरी परिसरात आणि शाळेत आनंदाचे व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

## ब्रम्हपुरी शहरात अतिक्रमण आणि...

(पान क्र. १ वरून)

अनधिकृत बांधकाम तात्काळ पाडण्यात यावे. संबंधित व्यक्तींवर IPC कलमांनुसार तातडीने गुन्हे दाखल करावेत. समाज भवनावरील बेकायदेशीर कब्जा हटवून ते सर्व नागरिकांसाठी खुले करावे परिसरात तातडीने पोलीस बंदोबस्त तैनात करावा. याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी.

'जर प्रशासनाने या प्रकरणात तातडीने आणि निष्पक्ष कारवाई केली नाही, तर आम्ही उच्च न्यायालयात जनहित याचिका (PIL) दाखल करू,' असा इशारा गांधीनगरमधील समस्त नागरिकांनी दिला आहे. आता या प्रकरणाकडे ब्रह्मपुरी नगरपरिषद आणि पोलीस प्रशासन कशा प्रकारे पाहते आणि काय कारवाई करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# तहसिलच्या ध्वजस्तंभावर तिरंगा फडकवा

## भाजपचे एसडीओंना निवेदन, महाराष्ट्र दिनापूर्वी कार्यवाहीची मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील तहसील कार्यालय परिसरात राष्ट्रीय तिरंगा ध्वज फडकविण्यासाठी उभारण्यात आलेल्या उंच ध्वजस्तंभावर मागील एक ते दीड वर्षांपासून तिरंगा ध्वज फडकविण्यात आलेला नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, याविरोधात भारतीय जनता पार्टीच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.

भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, तिरंगा हा देशाच्या स्वाभिमानाचे, एकात्मतेचे व बलिदानाचे सर्वोच्च प्रतीक असून, शासकीय कार्यालयातच त्याकडे होत असलेले दुर्लक्ष ही अत्यंत खेदजनक व संतापजनक बाब आहे. या घटनेमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या भावना दुखावल्या जात असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या संदर्भात यापूर्वीही अनेक वेळा तोंडी व लेखी स्वरूपात निवेदने देण्यात आली होती. तसेच विविध वृत्तपत्रांमधूनही हा मुद्दा वारंवार उपस्थित करण्यात आला आहे. तरीदेखील संबंधित विभागाकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आगामी १ मे – महाराष्ट्र दिन लक्षात घेता, त्यादिवसाचे औचित्य साधून तहसील कार्यालयातील ध्वजस्तंभावर राष्ट्रीय तिरंगा ध्वज फडकविण्यात यावा, अशी ठाम मागणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच, या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन ध्वज फडकविण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास भारतीय जनता पार्टीच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदन देतांना भारतीय जनता पार्टीचे ब्रम्हपुरी शहराचे अध्यक्ष प्रा. डॉ.सुयोग बाळबुधे, माजी अध्यक्ष अरविंद नंदुरकर, शहर महामंत्री मनोज भूपाल, पवन जयस्वाल, स्वप्नील अलगदेवे, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

झाडे लावा, झाडे जगवा...


बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
Lubi PUMPS-MOTORS
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
Kirloskar
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404